**दिव्य मराठी विशेष** • विद्यापीठे-१८, स्वयंसेवक-५४, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या संघात-६

# 'एनआरडी'च्या अंतिम संघ निवडीसाठी यंदा गुजरातमध्ये शिबिर

## ५ ते १४ नोव्हेंबरदरम्यान दहादिवसीय शिबिर

प्रतिनिधी | औरंगाबाद

दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित पथसंचलनात भाग घेण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचा संघ यंदा गुजरातेत निवडला जाईल. या शिबिरात सहभागी होण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील रासेयोचा संघ रविवारी (३ नोव्हेंबर) गुजरातला रवाना होणार आहे. राज्यातील १८ विद्यापीठांचे ५४ स्वयंसेवकही या शिबिरासाठी जात आहेत. ५ ते १४ नोव्हेंबरदरम्यान शिबिर होणार आहे.

महाराष्ट्रातील प्रादेशिक विद्यापीठांचा संघ निवडीसाठी १३ ते १६ सप्टेंबरदरम्यान येथील विद्यापीठात शिबिर झाले होते. या शिबिरात २० विद्यापीठांच्या ३०० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता. डॉ. आंबेडकर विद्यापीठाच्या ३० जणांनी यामध्ये सहभाग घेतला होता. यापैकी ६ जणांची निवड झाली आहे. त्यांना ३ नोव्हेंबरला गुजरातला रवाना करण्यात येत आहे. पाटण येथील हेमचंद्राचार्य नॉर्थ गुजरात विद्यापीठात आता अंतिम संघाची निवड केली जाणार आहे. सहा जणांमध्ये ३ विद्यार्थी स्वयंसेवक आणि ३ विद्यार्थिनी स्वयंसेवकांचा सहभाग आहे. राज्यातून दोघांचीच संघनायक म्हणून निवड झाली आहे. त्यामध्येही एक जण डॉ. आंबेडकर विद्यापीठातील प्राध्यापकाचा समावेश आहे. बिडकीन येथील कला महाविद्यालयाच्या प्रा. वैशाली पेरके असे त्यांचे नाव आहे. नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. संतोष पाटील यांचीही संघनायक म्हणून निवड झाली आहे. संघात शिवानी लहाने, पूजा पवार, तेजस्विनी वानखेडे, आदित्य माले, रवी जामनिक, रेड्डी बिभीषण यांचा समावेश आहे. कुलगुरू डॉ. प्रमोद येवले. प्र-कुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते. प्रभारी कुलसचिव डॉ. साधना पांडे. रासेयो संचालक डॉ. टी. आर. पाटील यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.



विद्यापीठाचा संघ गुजरातला रवाना करण्यात आला. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. साधना पांडे, डॉ. टी. आर. पाटील

### मुंबई विद्यापीठाचे सर्वाधिक ८ स्वयंसेवक

मुंबई, एसएनडीटी विद्यापीठ-३, मुंबई विद्यापीठ-८, सोलापूर विद्यापीठ-४, सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे-९, बार्टी-९, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ-४, नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ-१, आरोग्य विज्ञान विद्यापीठ-२, नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ-६, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ-१, गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठ-२, अमरावती, संत गाडगेबाबा विद्यापीठ-४, जळगाव विद्यापीठ-३, परभणी, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, नांदेड विद्यापीठ-१.


WEST ZONE PRE REPUBLIC DAY PARADE CAMP-2019
5th to 14th November, 2019
Participating States & UT
WEST ZONE
PRE REPUBLIC DAY
PARADE CAMP-2019
WEST ZONE PRE REPUBLIC DAY PARADE CAMP - 20


WEST ZONE PRE REPUBLIC DAY PARADE CAMP-2019
5th to 14th November, 2019
Participating States & UT
Andhra Pradesh, Telengana, Maharashtra, Goa, UT of Daman & Diu, Gujarat
Organised by
Government of India
WEST ZONE
PRE REPUBLIC DAY
PARADE CAMP-2019
WEST ZONE PRE REPUBLIC DAY PARADE CAMP - 20

सत्यमेव जयते

भारत सरकार
Government of India
युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालय
Ministry of Youth Affairs & Sports
राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय निदेशालय, अहमदाबाद ( गुजरात )
NSS REGIONAL DIRECTORATE, AHMEDABAD (GUJARAT)

# प्रमाणपत्र
# CERTIFICATE

प्रमाणित किया जाता है कि / Certified that

श्री / कुमारी / Mr. / Ms. LAXMAN BIBHISHAN RIDDE

सुपुत्र / सुपुत्री श्री / Son / Daughter of Shri BIBHISHAN KERBA RIDDE

रा.से.यो. स्वयंसेवक / कार्यक्रम अधिकारी
NSS Volunteer / Programme Officer of G.I.F.S.A. Aurangabad. (Dr.B.A.M.U. Aurangabad) राज्य State Maharashtr

ने ५ से १४ नवम्बर, २०१९ तक राष्ट्रीय सेवा योजना पूर्व गणतंत्र दिवस परेड शिविर हेमचंद्राचार्य उत्तर गुजरात विश्वविद्यालय, पाटण के आयोजन में सहभागिता की
has participated in the NSS Pre Republic Day Parade Camp held at Hemchandracharya North Gujarat University, Patan from 5th to 14th November, 2019.

डो. जे डी दामोर / Dr. J D Damor
कार्यक्रम समन्वयक, रा.से.यो.
Programme Co-ordinator, NSS
हेमचंद्राचार्य उत्तर गुजरात विश्वविद्यालय, पाटण
Hemchandracharya North Gujarat University, Patan

गिरधर उपाध्याय / Girdhar Upadhyay
क्षेत्रीय निदेशक
Regional Director
राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय निदेशालय
अहमदाबाद ( गुजरात )
NSS Regional Directorate, Ahmedabad (GUJARAT)

प्रो. अनिल नायक / Prof. Anil Naya
कुलपि
Vice Chancello
हेमचंद्राचार्य उत्तर गुजरात विश्वविद्यालय, पाटण
Hemchandracharya North Gujarat University, Pata